**दि. २४/०१/२०१३ रोजी पुणे येथे झालेल्या ७ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत.**

**<u>कार्यवृत्तांत</u>**

महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाची ७ वी बैठक गुरुवार दि. २४ जानेवारी २०१३ रोजी कॉन्सील हॉल (विधान भवन), पुणे येथे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, नामदार श्री. पृथ्वीराजजी चव्हाण यांचे अध्यक्षतेखाली सकाळी ११.०० वाजता संपन्न झाली. बैठकीतील ईतर उपस्थितांची नावे सोबतच्या यादीत दिलेली आहे. सभेच्या सुरुवातीस प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर तथा सदस्य सचिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेची पार्श्वभूमी व सभेत ठेवण्यात आलेल्या विषयांबाबत प्रास्ताविक केले. त्यानंतर मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने विषयसूचीनुसार सभेत माहिती दिली. बैठकीत देण्यात आलेली माहिती झालेली चर्चा व मंडळाने घेलले निर्णय खालील प्रमाणे आहेत.

**विषय क्र. १ (ब) :- दि. २४/०१/२०१३ रोजी पुणे येथे झालेल्या ७ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत कायम करणे.**

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) तथा सदस्य सचिव यांनी बैठकीत असे सांगीतले की, मागील बैठकीचे कार्यवृत्तांत सर्व मा. सदस्यांना पाठविण्यात आले होते. त्यावर कोणत्याही सदस्यांनी आपले अभिप्राय कळविले नाही. या कार्यवृत्तांतास मंजूरी देण्यास त्यांनी मंडळास विनंती केली. तरी त्याप्रमाणे दिनांक २४ जानेवारी २०१३ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास मंजूरी देण्यात यावी.

**विषय क्र. २ :- राष्ट्रीय उद्यान / अभयारण्यात व त्या भोवतालच्या १०.०० कि.मी. च्या परिसरातील इतर विकास कामांना मंजूरी देणे.**

| अ.क्र. | मुद्दा | झालेली चर्चा व घेतलेले निर्णय | केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| २.१ | **लेंन्झिग मोदी फायबर इंडीया लिमीटेड यांचा ८०००० TPA विस्कॉस स्टेपल फायबर निर्मीतीचा प्रस्ताव, अतिरिक्त पाताळगंगा प्लॉट नंबर एम-१ आणि एम-२, ग्राम सारसई तह. पनवेल जि. रायगडच्या प्रस्तावाला मान्यता** | प्रकल्पक्षेत्र कर्नाळा पक्षी अभयारण्यापासून १.५ कि.मी. अंतरावर असले तरी सद्या अस्तित्वात असलेल्या औद्योगीक विकास मंहामंडळाच्या हददीतच हा प्रकल्प येणार असल्यामुळे या प्रकल्पाची शिफारस राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडे करण्यांस मान्यता प्रदान करण्यांत आली. परंतु यासह राज्यातील सर्वच संरक्षीत क्षेत्राचे इको सेन्सिटिव्ह झोन चे प्रस्ताव तात्काळ सादर करण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या. | १. राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीची दि.०६ जून २०१३ रोजी झालेल्या २९ व्या बैठकित व दिनांक ४/९/२०१३ रोजी झालेल्या ३० व्या बैठकित या प्रकल्पाबाबत चर्चा झाली. चर्चेत या प्रकरणी नंतर मत प्रदर्शित करण्यांत येईल असा निर्णय घेण्यांत आला. (It was decided to take a view on this matter later.)<br>२. (चांदोली राष्ट्रीय उद्यान /राधानगरी/कोका/ताम्हिणी/मालवण सागरी अभयारण्य वगळुन) सर्व राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य भोवती |

| | | | |
|---|---|---|---|
| | **देणे.** | | पर्यावरण संवेदनशिल क्षेत्र निर्मीतीचे प्रस्ताव राज्य शासनास सादर करण्यांत आले असून ३५ संरक्षीत क्षेत्राचे प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनास सादर करण्यांत आलेले आहेत. नवनिर्मित कोका व ताम्हिणी अभयारण्य क्षेत्राचे पर्यावरण संवेदनशिल क्षेत्र निर्मितीचे प्रस्तावाबाबत क्षेत्रीय स्तरावर कामे सुरु आहेत. चांदोली राष्ट्रीय उद्यान व राधानगरी अभयारण्याचे प्रस्तावावर राज्य शासनाकडून अधिकची माहिती मागविण्यात आलेली आहे. मालवण सागरी अभयारण्यास स्थानिक मच्छिमार, ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांचा तीव्र विरोध आहे. अभयारण्य अरबी समुद्रात असून, त्याचे कोणतेही क्षेत्र जमिनीवर नाही, अशी परिस्थिती असल्यामुळे मालवण सागरी अभयारण्य भोवती पर्यावरण संवेदनशील क्षेत्र करण्याची गरज नाही असे मत राज्य शासनास पत्र क्र. ४५३२ दि. ०१/०३/२०१३ अन्वये कळविण्यात आलेले आहे. |
| २.२ | **वनजमीन-रायगड ताम्बडी लघुपाटबंधारे योजना त.रोहा जि.रायगड २.८६ हेक्टर प्रस्तावाला मान्यता देणे.** | यापूर्वी मंडळाच्या बैठकीमध्ये सिंचन विभागाच्या अधिका-यांना स्पष्टपणे सूचना देण्यांत आलेल्या होत्या की, वन्यजीवांचा अधिवास कालव्यांमुळे खंडीत होत असल्याने त्यावर तात्काळ उपाययोजना करण्यांत येवून त्या उपाययोजनांवर अंमलबजावणी करण्यांत यावी, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही सिंचन विभागाकडून होत नसल्याने मंडळाच्या सदस्यांकडून नाराजी व्यक्त करण्यांत आली त्यामुळे यापूर्वी सांगीतलेल्या सर्व उपाययोजनांची अंमलबजावणी पूर्ण होईपर्यंत या प्रस्तावाची शिफारस करण्यांत येवू नये असे ठरले. | राज्य वन्यजीव मंडळाचे दि. २४/१/२०१३ रोजी झालेल्या ७ व्या बैठकित घेतलेल्या निर्णयानुसार डॉ. एरिक भरुचा यांचे अध्यक्षतेखाली चार सदस्यीय समितीचा अहवाल मंडळाचे पुढील बैठकित ठेवण्यासाठी राज्य शासनास या कार्यालयाचे पत्र क्रमांक२३(२)/सर्व्हे/ प्र.क्र.४३/(IV)/११/४८३७, दि.२८/०१/२०१४ अन्वये सादर करण्यांत आलेला आहे. त्यामध्ये कमेटीने खालील मुद्यावर सविस्तर चर्चा केलेली आहे. “Committee has considered all possible impact of the project viz. Landscape, Ecological issues, wildlife needs, impact on backwater aquatic system, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | downstream riverline ecology, Biodiversity and local livelihood and came out with possible mitigation measures.” त्यावरील विदर्भ सिंचन विकास महामंडळ यांचे दि.१८/०७/२०१३ रोजीचे पत्र ही राज्य शासनास त्यासोबत सादर करण्यात आलेले आहे. |
| २.३ | **गौताळा औट्रमघाट क्षेत्रातुन औरंगाबाद-कन्नड-चाळीसगाव या महामार्ग क्र.२११ च्या कडेने ऑप्टीकल फायबर केबल टाकण्याचा प्रस्ताव ( क्षेत्र ०.३७२ हे.) ला मान्यता देणे.** | सदर प्रस्तावाची शिफारस राष्ट्रीय वन्यजीव मंडळास करण्यास शिफारस करण्यांत आली. | १. राज्य शासनाचे पत्र क्रमांक डब्ल्युएलपी २०.१२/सीआर ३०३/फ-१, दि. ८/३/२०१३ अन्वये प्रस्ताव राष्ट्रीय वन्यजीव मंडळाचे स्थायी समितीचे विचारार्थ ठेवण्यास केंद्र शासनास सादर केला होता.<br>२. केंद्र शासनाचे पत्र क्रमांक एफ. क्र. ६/१०८/२०१३ वजी दि. ०१/१०/२०१३ अन्वये प्रस्तावाच्या १५ प्रती व रंगीत नकाशे व सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे काय ही माहिती मागीतली आहे. सदर माहिती या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-२३(२)/सर्व्हे/प्र.क्र.४८/३२०९ दि. २०/१२/२०१३ अन्वये केंद्र शासनास सादर करण्यात आलेली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| २.४ | **वनजमीन-नागपूर पेंच पाटबंधारे प्रकल्प खिंडसी पुरक कालवा योजना ता.पारशिवनी जि.नागपूर प्रकल्पाकरिता १६.४० हे. वनजमीनीच्या वळती करण्याच्या प्रस्तावाला मान्यता देणे.** | नागपूर शहर तसेच मिहान क्षेत्रास पाणीपुरवठयाची ही योजना असल्याची बाब सिंचन विभागाच्या अधिका-यांनी प्रामुख्याने मांडली मात्र माननीय सदस्यांनी या क्षेत्रात अनेकवेळा वाघ व इतरही वन्यप्राण्यांचा मृत्यु व त्यांच्या अधिवासास धोका उत्पन्न होवून कालव्यांमुळे वन्यप्राण्यांच्या भ्रमणमार्गात अडथळे निर्माण होत असल्याची बाब मंडळाचे निदर्शनास आणून दिली. चर्चेअंती मंडळाचे सदस्य डॉ. एरीक भरूचा, श्री. किशोर रीठे, सिंचन व वन विभागाचे एक-एक प्रतिनिधी अशी एक टिम तयार करून त्या टिमने प्रत्यक्ष क्षेत्राचा अभ्यास करून आपला अहवाल मंडळास सादर करावा, त्यासोबतच या क्षेत्राचे video चित्रीकरण करण्यांत यावे असेही ठरले व त्यानंतर टिमचा अहवाल विचारात घेवून प्रस्तावावर विचार करण्यांत येईल असे ठरविण्यांत आले. | राज्य वन्यजीव मंडळाचे दिनांक २४/१/२०१३ रोजी झालेल्या ७ व्या बैठकित घेतलेल्या निर्णयानुसार चार सदस्यीय समितीचा अहवाल पुढील निर्णयास्तव या कार्यालयाचे पत्र क्रमांक २३(२)/सर्व्हे/प्र.क्र.४३/(१०-११)/४८३७, दि. २८/०१/२०१४ अन्वये राज्य शासनास सादर करण्यांत आलेला आहे. त्यामध्ये कमेटीने खालील मुद्यावर सविस्तर चर्चा केलेली आहे. “Committee has considered all possible impact of the project viz. Landscape, Ecological issues, wildlife needs, impact on backwater aquatic system, downstream riverline ecology, Biodiversity and local livelihood and came out with possible mitigation measures.” |

| | | | |
|---|---|---|---|
| २.५ | **नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ ता. पनवेल जि. रायगड या प्रस्तावाला मान्यता देणे.** | प्रस्तावावर चर्चा करून मा. अध्यक्षांनी मुख्य वन्यजीव रक्षक यांनी स्वत: प्रकल्प क्षेत्रास भेट देण्याच्या सूचना केल्या व तातडीने इको सेन्सिटीव्ह झोनचे प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश मा. अध्यक्षांनी दिलेत. डॉ. असद रहमानी, सदस्य राज्य वन्यजीव मंडळ यांनी कर्नाळा पक्षी अभयारण्यातील पक्ष्यांच्या संख्ये बाबत संनियंत्रण करण्यांत येत असल्याचे मंडळाचे निदर्शनास आणून दिले. मा. अध्यक्षांनी या क्षेत्राच्या संवेदनशिलतेचे विश्लेषण होणे आवश्यक आहे, जेणेकरून राष्ट्रीय वन्यजीव मंडळात हा प्रस्ताव मान्य करण्यास अडचणी येणार नाहीत.<br>वरील सर्व बाबींची पूर्तता झालेनंतर या प्रस्तावाची शिफारस करण्यांस मान्यता देण्यांत आली. | १. राज्य वन्यजीव मंडळाचे दि. २४/०१/२०१३ रोजी झालेल्या ७ व्या बैठकीत मा.अध्यक्षांनी मुख्य वन्यजीव रक्षक यांनी स्वत: प्रकल्प क्षेत्रास भेट देण्याच्या सूचना केल्या. त्यानुसार मुख्य वन्यजीव रक्षक यांनी दि. १४/०२/२०१३ रोजी सदर क्षेत्रास भेट दिलेली असून त्यांचा अहवाल पत्र क्र. ४६४४ दि. ०७/०३/२०१३ अन्वये राज्य शासनास सादर केलेला आहे.<br>२. सदर प्रस्ताव राष्ट्रीय वन्यजीव मंडळाचे दि. २०/३/२०१३ रोजी झालेल्या २८ व्या बैठकित चर्चेला आला असून, बैठकित घेतलेल्या निर्णयानुसार मंडळाचे सदस्य श्री किशोर रिठे व डॉ. असद रहमानी यांनी सदर क्षेत्राची तपासणी करुन अहवाल सादर करावयाचा होता.<br>३. दि. ९/५/२०१३ व दि. १०/५/२०१३ रोजी श्री डॉ. दिव्यभानुसिंह चावडा अतिरिक्त महानिर्देशक (वजी) व श्री किशोर रिठे सदस्य, राज्य वन्यजीव मंडळ यांनी सदर क्षेत्राची तपासणी केली.<br>४. श्री देवी गोयनंका यांनी सदर सद्यस्थिती प्रकरणी PIL दाखल केलेली आहे.<br>५. राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीने काही शर्ती व अटीवर प्रकल्प मान्य करण्यास शिफारस केलेली आहे. |
| २.६ | **रापेरी साठवण लघु पाटबंधारे योजना (राखीव वनक्षेत्र- ८.७५ हे.)तालुका कारंजा, जिल्हा- वाशिम, या प्रस्तावाला मान्यता देणे.** | या प्रस्तावाची शिफारस करण्यांस मंडळाने मान्यता प्रदान केली. | प्रस्ताव राज्य शासनाकडून केंद्र शासनास सादर झालेला आहे. केंद्र शासनाचे स्तरावर राष्ट्रीय वन्यजीव मंडळाचे स्थायी समितीचे पुढे चर्चेसाठी ठेवण्यात येईल असे अपेक्षित आहे. |

**विषय क्रमांक ३ अ- नवीन अभयारण्याचे / कन्झर्वेशन रिझर्वचे प्रस्ताव मंडळाच्या अवलोकनार्थ तथा शिफारशीस्तव पटलावर ठेवणे.**

| अक्र | मुद्दा | झालेली चर्चा व घेतलेले निर्णय | केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ३अ.१ | **कोलामार्का संवर्धन राखीव, जि. गडचिरोली.** | मंडळाच्या सहाव्या बैठकीमध्येच कोलामार्का हे संवर्धन राखीव घोषीत करण्याची शिफारस करण्यांत आलेली होती. यावर मा. सदस्य श्री. किशोर रीठे यांनी मंडळाचे निदर्शनास आणून दिले की, जगात आता रानम्हशी हा वन्यजीव जवळपास संपुष्टात येण्याच्या मार्गावर असून त्याचे संवर्धन करण्याची नितांत आवश्यकता असल्याने संवर्धन राखीव ऐवजी हे अभयारण्य घोषीत करण्यांत यावे असे सूचविले. परंतु हा भाग नक्षलग्रस्त क्षेत्रात येत असून अभयारण्यामुळे विविध बाबींवर येणा-या निर्बंधामुळे स्थानिकांमध्ये असंतोष येवू शकतो त्यामुळे मा. अध्यक्षांनी सूचविले की, हळुहळु तेथील गावांचे पुनर्वसन करण्याचा प्रथम प्रयत्न करावा व त्यांनतरच अभयारण्य घोषीत करण्याचा विचार करता येईल तोपर्यंत सद्या या क्षेत्रास संवर्धन राखीव म्हणून घोषीत करण्यांत यावे. | राज्य शासनाने दि. ०८/१/२०१३ अन्वये १८०.७२ चौ.कि.मी. क्षेत्राची अधिसूचना जाहीर केल्यानंतर राखीव क्षेत्रातील रानम्हशी यांचे हालचालीवर नियमीत लक्ष ठेवण्यात येत आहे. राखीव क्षेत्राचा व्यवस्थापन आराखडा तयार करण्याची क्षेत्रीय कामे गडचिरोली वनवृत्तातील सिरोंचा वनविभाग मार्फत चालू आहे. त्यात व्यवस्थापन संबंधीत सर्व बाबींवर सर्वकर्ष विचार करण्यात येईल. |
| ३अ.२ | **ताम्हिणी अभयारण्य जि. पुणे व रायगड.** | शासनाकडून पुढील महिन्यात याविषयीची कार्यवाही पूर्ण करण्यांत येईल, असे कळविण्यांत आले. | राज्य शासनाने दि. ०३/०५/२०१३ अन्वये ४९.६२ चौ.कि.मी. क्षेत्राची अधिसूचना जारी केली आहे. |
| ३अ.३ | **ईसापूर पक्षी अभयारण्याची निर्मीती.** | या प्रस्तावास मंडळाने मान्यता प्रदान केली. | महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाची ५ वी बैठक दिनांक २८ जून २०११ रोजी मा. मुख्यमंत्री यांचे समिती कक्ष, मुंबई येथे मा. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयानूसार “अभयारण्य अधिसूचित करण्याचा प्रस्ताव जलसंपदा विभागा मार्फत शासनास सादर करण्यात यावा.” त्या अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. २३(२)/सर्वे/प्र.क्र.४७(२)/११४१ दि. २५/०६/२०१३ अन्वये एकूण ३९.१५ चौ.कि.मी. क्षेत्राचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून शासनास सादर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये जलसंपदा विभागाने उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचे ईसापूर जलाशयासाठी संपादीत केलेले व खाजगी क्षेत्र २५.१८ चौ.कि.मी. तसेच ईसापूर जलाशयालगत असलेले राखीव वन १३.९७ चौ.कि.मी. क्षेत्राचा समावेश आहे. दि. २०/१२/२०१३ रोजी प्रधान सचिव (वने) यांनी दिलेल्या सुचनेनुसार सुधारीत प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. |

**विषय क्रमांक ३ ब- नवीन रामसार साईट घोषीत करण्यासाठी नामांकन पाठविणे :**

| अक्र | मुद्दा | झालेली चर्चा व घेतलेले निर्णय | केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ३ब.१ | **जायकवाडी रामसार निर्मीतीबाबत.** | सदरचे क्षेत्र हे सद्यस्थितीत अभयारण्य असल्यामुळे या क्षेत्रास रामसर साईट म्हणून नामांकन पाठविण्याची मंडळाने शिफारस केली. | सदर प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-२३(२)/सर्वे/प्र.क्र.३७/५०६० दि. ०७/०२/२०१४ अन्वये राज्य शासनास सादर करण्यात आलेला असून या क्षेत्रास रामसर साईट म्हणून केंद्र शासनास नामांकन पाठविण्याची पुढील कार्यवाही राज्य शासनाकडून अपेक्षित आहे. |
| ३ब. २ | **लोणार सरोवर रामसार वेटलॅन्ड निर्मीतीबाबत:** | सदरचे क्षेत्र हे सद्यस्थितीत अभयारण्य असल्यामुळे या क्षेत्रास रामसर साईट म्हणून नामांकन पाठविण्याची मंडळाने शिफारस केली. | सदर प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-२३(२)/सर्वे/प्र.क्र.९५ /१७९४ दि. १६/०९/२००८ अन्वये राज्य शासनास सादर करण्यात आलेला होता. शासनाने डॉ. असद आर. रहमानी संचालक, बॉम्बे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | नॅचरल हिस्ट्री सोसायटी, मुंबई यांना प्रस्तावाची प्रत पून्हा उपलब्ध करुन देऊन त्यांचे कडून सदर प्रस्तावात काही फेरबदल सुचवावयाचे आवश्यक असल्यास त्याची तपासणी करुन घेतल्यानंतर सुधारीत प्रस्ताव शासनास सादर करावा असे निर्देश प्राप्त झालेले आहे. |
| ३ब.३ | **नांदुर मधमेश्वर जलाशय क्षेत्र रामसार वेटलॅन्ड निर्मीतीबाबत** | सदरचे क्षेत्र हे सद्यस्थितीत अभयारण्य असल्यामुळे या क्षेत्रास रामसर साईट म्हणून नामांकन पाठविण्याची मंडळाने शिफारस केली. | सदर प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-२३(२)/सर्वे/प्र.क्र.३७ /५०५९ दि. ०७/०२/२०१४ अन्वये राज्य शासनास सादर करण्यात आलेला असून या क्षेत्रास रामसर साईट म्हणून केंद्र शासनास नामांकन पाठविण्याची पुढील कार्यवाही राज्य शासनाकडून अपेक्षित आहे. |

**विषय क्रमांक ४ - अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय**

| अ.क्र. | मुद्या | झालेली चर्चा व घेतलेले निर्णय | केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ४.१ | **वन अधिकारी यांच्या वाहनावर अंबर दिवा लावण्यासाठी मान्यता देणे.** | मा. अध्यक्षांनी याबाबत संबंधीत विभागांनी त्वरीत कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. | दि. १७/८/२०१३ चे शासन निर्णयानुसार वनविभागातील सर्व प्रधान मुख्य वनसंरक्षक वन व वन्यजीव कायदाचे अंमलबजावणी करणारे व हे पोलिस महानिदेशक स्तराचे समकक्ष असल्याने फ्लैसर नसलेले लाल दिवा लावण्यास पात्र ठरतात. वरिष्ठ वन अधिका-यांचे वाहनावर इतर फ्लैसर नसलेला दिवा लावण्यास मान्य करण्यासाठी शासन निर्णयामध्ये सुधारणेसाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) यांनी शासनास दि. २९/०८/२०१३ रोजीचे पत्रा व्दारे विनंती केलेली आहे. तसेच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे अ.शा. पत्र क्र. कक्ष-१८/दक्षता/प्र.क्र.-६०/१०१८, दि. ३०/०९/२०१३ अन्वये अतिरिक्त मुख्य सचिव महसूल, मंत्रालय, मुंबई यांना वनाधिका-यांच्या शासकीय वाहनांवर अंबर दिवा/लाल दिवा लावण्यास मंजूरी देणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे. त्यास अद्यापही मंजूरी प्राप्त झालेली नाही. |
| ४.२. | **राज्य जैव विविधता मंडळाकरिता आवश्यक मनुष्यबळ.** | मा. अध्यक्षांनी संबंधीत खात्याने याबाबत त्वरीत आवश्यक कार्यवाही करावी अशा सूचना दिल्या. | महाराष्ट्र राज्य जैवविविधता नियम २००८ नुसार शासन निर्णय दि. ०२/०१/२०१२ अन्वये राज्य जैवविविधता मंडळाची स्थापना केली आहे. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर यांचे कार्यालयीन पत्र क्र. म.रा.जै.वि.मं/अनुदान/प्र.क्र.३/१८१ दि २२/०७/२०१३ अन्वये महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळासाठी आवश्यक असलेल्या १७ पदांचा प्रस्ताव प्रधान सचिव (वने) महसूल व वनविभाग यांना सादर केलेला आहे. वर नमुद केलेल्या १७ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पदांपैकी शासन निर्णय क्र. डब्लुएलपी२००९/प्र.क्र.१५/फ-१ दि.२९/०७/२०१३ अन्वये खालील प्रमाणे फक्त ८ पदांची निर्मिती करण्यास मंजूरी प्राप्त झालेली आहे. अध्यक्ष-१, व्यवस्थापक, जैविक साधन संपत्ती-१, अध्यक्षांचे उच्चश्रेणी लघुलेखक तथा स्विय सहाय्यक-१, सदस्य सचिवांचे उच्चश्रेणी लघुलेखक तथा स्विय सहाय्यक-१, लेखापाल-१,लिपीक-१, शिपाई-२, **एकूण ८ पदे.**<br>परंतू महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाकरीता नविन लेखा शिर्ष उघडणेची कार्यवाही शासन स्तरावर प्रलंबीत असून सदर पदावरील आस्थापनेच्या खर्चासाठी अनुदान अप्राप्त आहे. |
| ४.३ | **वाहनाचा आकृतीबंध वन व वन्यजीव संरक्षणासाठी वाहन संख्या वाढविणे.** | वाढीव ३६९ वाहनांपैकी १०० वाहने सन २०१२-२०१३ मध्ये खरेदी करण्याची परवानगी आहे. वाहनांच्या आकृती बंधातील प्रस्तावीत वाढीस मंजूरी देवून राहीलेली २६९ वाहने खरेदिची परवानगी सन २०१३-२०१४ मध्ये मिळावी अशी मागणी केली असता मा. अध्यक्षांनी याबाबत संबंधीत विभागाने त्वरित कार्यवाही करावी अशी सूचना केली. | तेरावा वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार वनांचे व्यवस्थापन या योजनेकरिता केंद्र शासनाकडील प्राप्त निधीच्या अनुषंगाने सन २०१२-१३ मध्ये उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये वन विभागाकरीता १०० वाहने खरेदी करण्यासाठी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली होती. त्यानुसार तेरावा वित्त आयोगाअंतर्गत वन संरक्षण या योजनेखाली ८४ वाहनाच्या खरेदी साठी निधी मंजूर करण्यात आला होता. तसेच कॅम्पा मधून १६ वाहनाच्या खरेदी साठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्यानुसार ८४ वाहने खरेदी करण्यात आलेले आहे.<br>दि. २३/०५/२०१३ रोजी मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या उच्चस्तरीय संनियंत्रण समितीच्या बैठकीत तेरावा वित्त आयोगा अंतर्गत वन संरक्षण या योजनेत सन २०१३-१४ मध्ये खालील प्रमाणे कामे प्रस्तावित करण्यात आली होती.<br>**१.** वनसंरक्षण योजना :- २० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | निर्लेखित वाहना ऐवजी २० नविन वाहने खरेदी करणे/१२ क्षमतेचे १९ मोबाईल व्हॅन खरेदी करणे/वनपरिक्षेत्र व्यवस्थापनेकरीता २०० नविन मोटर सायकल खरेदी करणे<br>**२.** वन्यजीव संवर्धन योजना:- वन्यजीव शाखेकरीता ४ नविन वाहने खरेदी करणे.<br>**३.** अपेक्षित खर्च रु. ४७३.०० लक्ष<br>परंतू वित्त विभागाने वरील प्रस्तावित वाहन खरेदीकरीता आक्षेप घेतल्यामुळे सुधारीत (मंजूर) प्रस्तावात फक्त ६० मोटर सायकल वनसंरक्षण योजने अंतर्गत खरेदी करण्यासाठी रु. ३०.०० लक्ष तरतूदी मंजूर करण्यात आली आहे. |
| ४.४ | **प्रत्येक व्याघ्र प्रकल्पाला प्रत्येकी १ पशुवैद्यकिय अधिकारी नियुक्तीस मान्यता देणे.** | राज्यातील चारही व्याघ्र प्रकल्पासाठी पशुवैद्यकिय अधिकारी नियुक्त करण्याची मंडळाने मागणी केली व मा. अध्यक्षांनी त्यास अनुकूलता दर्शविली आणि याबाबत संबंधीत विभागाने त्वरित कार्यवाही करावी अशी सूचना केली. | प्रत्येक व्याघ्र प्रकल्पामध्ये प्रत्येकी एक पशुवैद्यकिय अधिकारी यांना नियुक्ती करणेबाबत नवीन बाब प्रस्ताव शासनास क्रमांक कक्ष २२(४)/आस्था/प्र.क्र.१३७/१३-१४/ ८७८, दिनांक ५/६/२०१३ अन्वये सादर करण्यांत आलेला आहे. तात्पुरते व्यवस्था म्हणून व्याघ्र-संवर्धन प्रतिष्ठान व्दारे ताडोबा-अंधारी, पेंच व मेळघाट व्याघ्र प्रकल्पा करीता कंत्राटी पध्दतीने शासनाचे पत्र क्रमांक डब्ल्युएलपी-२०१३ /प्र.क्र. १६९/फ-१, मुंबई दिनांक ७ मे २०१३ अन्वये मंजूरी घेऊन पशु वैद्यकिय अधिकारी लावण्यात आलेला आहे. |
| ४.५ | **वनरक्षकाच्या भरतीवरिल निर्बंध मागे घेण्याबाबत.** | अमूल्य वन्यजीव आणि वनसंपत्तीचे योग्य प्रकारे संरक्षण होण्यासाठी वनविभागातील वनरक्षक पदास पद भरती निर्बंधातून वगळण्याबाबतच्या प्रस्तावास | वनविभागातील वनरक्षक पदास भरती निर्बंधातून नेहमीकरीता वगळण्याबाबत मा. मुख्य सचिव यांनी अनुकूलता दर्शविलेली आहे. त्या अनुषंगाने अपर प्रधान मुख्य |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मान्यता देण्याबाबत मंडळाने शिफारस केली. मा. अध्यक्षांनी यावर अनुकूलता दर्शविली, आणि संबंधित विभागाने यावर त्वरीत कार्यवाही करावी अशी सुचना केली. | वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र. /१३१३ दि. ११/०१/२०१३ अन्वये वनविभागातील वन आणि वन्यजीव संरक्षणामधील सर्वात महत्वाचे आणि क्षेत्रीय स्तरावरील (Front Line Staff) वन आणि वन्यजीव संरक्षणाचे काम करणा-या वनरक्षक या पदास नेहमीकरीता पदभरती निर्बंधातुन वगळण्या विषयी शासनास विनंती केली आहे. |